गुरुतत्त्वतरंगिणी

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

गुरुतत्त्वतरंगिणी

(गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

❊ गुरुतत्त्वतरंगिणी ❊

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी चौथी : डिसेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

प्रास्ताविक

माणसाचं जीवन ही एक विलक्षण गोष्ट आहे. त्याला अनेक क्षमता नकळत मिळालेल्या आहेत. त्यातली सर्वांत मोठी क्षमता सावधानता ही आहे. या सावधानतेला पशूंच्यासारखं नुसतं स्वसंरक्षण किंवा आक्रमण असल्या सामान्य पातळीवरचं स्थान नाही. या सावधानतेनं तो स्वतःच्या या अज्ञात क्षमता शोधून काढू शकतो. त्या वापरू शकतो. ज्ञानी माणसांकडून त्याबद्दल शिकून घेऊ शकतो. याच सावधानतेनं त्याच्या ठिकाणी जी इतर पशुपक्ष्यांपेक्षा अत्यंत वेगळी क्षमता आहे, तिचं ज्ञानही त्याला होऊ शकतं, ती म्हणजे तो स्वतःकडं अलिप्ततेनं पाहू शकतो. स्वतःकडं पाहण्याचं केंद्र सदैव जागृतही ठेवू शकतो.

या जागं राहण्याचा परिणाम असा होतो की, जसं एखाद्या दुसऱ्या माणसाकडं पहावं आणि त्याच्या गुणदोषांचं आपल्याला ज्ञान व्हावं, सुधारणेचे उपाय सुचावेत तसं त्याला स्वतःकडं पाहता येत असल्यामुळं

स्वतःच्याही गुणदोषांचं, क्षमतांचं त्याला आकलन होऊ शकतं. अर्थातच या आकलनामुळं तो त्या क्षमतांचा वापरही करू शकतो. तो हे जाणू शकला नसता तर अर्थातच हा वापरही त्याला करता आला नसता.

ते जाणण्यासाठी लागणारी क्षमता आणि लागल्यास त्या क्षमता का दिल्या आहेत, याचा हेतू शोधून काढण्यापर्यंत लागणारी क्षमतेची झेप माणसाकडं आहे. आपल्या नुसत्या क्षमताच नव्हे तर क्षमतांच्या मर्यादा, त्यामधल्या उणिवा, त्यातल्या त्रुटी, दोष, कमतरता- अशा गोष्टींचं ज्ञान करून घेण्याची क्षमतासुद्धा त्याच्याकडं आहे. या ठिकाणी हे लक्षात घेणं लगेचच आवश्यक आहे की, तो जर या साऱ्या बाबतीत जागा असेल, तरच हे सगळं पुढचं कार्य आणि या क्षमतांचा उपयोग करून अगदी माणसाचा देव बनण्यापर्यंत ध्येय तो गाठू शकेल.

याचाच अर्थ जर ही जाग आली नाही, तर आधी म्हटली ती सारी प्रगती तेवढ्या प्रमाणात, तितक्या लवकर होणार नाही, हे उघड आहे. इतकंच नव्हे, तर ही जाग एखाद्याला काही कारणानं आलीच नाही, तर

पशुवत् जेवढ्या गरजांचं - तहान, भूक, झोप इत्यादी - भान त्याला निसर्गक्रमानं येतं, तेवढंतेवढं पुरं करण्यात त्याचं आयुष्य जाऊ शकेल ! त्यालाच तो आयुष्याची इतिकर्तव्यता मानेल. आधी म्हटल्याप्रमाणं अशा तऱ्हेचा विलक्षण विकास हा त्याच्या दृष्टीनं कुणी लक्षात आणून दिला, ऐकला तर, अशक्य कदाचित अनावश्यक गोष्टही वाटेल ! याचाच अर्थ ही जाग न आलेल्यांना या क्षमता त्यांच्याकडं असूनही त्यांच्या आयुष्यात हा मुक्ततेचा सोन्याचा दिवस कधीच उगवणार नाही.

म्हणून आयुष्यात स्वतःच्या मनुष्यत्वाची तटस्थपणानं जाग येणं किंवा कुणी ती करून देणं यासारखे मनुष्यावरचे उपकार नाहीत. ही जाग देण्याची जशी स्वतःमध्ये अंतर्गत क्षमता आहे, तशीच ती गोष्ट अशा पद्धतीनं होणं कठीण आहे. म्हणून ही जाग देण्याची जी निसर्गाची आणि त्या अर्थानं परमेश्वराची सार्वत्रिक यंत्रणा आहे, ती म्हणजे गुरुपद होय. एखाद्याला गाढ झोपेतून दुसऱ्या कुणीतरी उठवावं लागतं, तसं उत्क्रांतीच्या आधीच्या पशुजीवनाच्या प्रभावांच्या गाढ झोपेतून माणसालाही कुणीतरी

उठवावं लागतं. त्या कल्याणकारी यंत्रणेचं नाव गुरुपद होय. त्या व्यवस्थेचा कुणीतरी प्रतिनिधी ही जाग देण्याचं काम करतो.

त्यामुळं आलेली जाग पुढं टिकवणं, त्याचा उपयोग करणं, जाग आल्यामुळं आता शक्य असलेली वाटचाल करणं, टप्प्याटप्प्यानं आपलं ध्येय गाठणं, हे खरंतर प्रत्येक माणसाचं मनुष्य म्हणून कर्तव्य आहे आणि त्यात त्याच्या मनुष्यजीवनाचं सार्थकही आहे. ही जाग आल्यावर अनेकदा आपलं सध्याचं जीवन त्या अर्थानं बेसावध असताना अपूर्ण होतंच पण जाग आली की कळून येतं की, काही बाबतीत ते अपूर्ण राहणारच आहे. मग पूर्णत्वाचा अर्थ आणि शोध सुरू होतो. त्याबाबतीतही हे गुरुपदव्यवस्थेचे प्रतिनिधी मदत करतात, सोबत करतात.

कुठल्याही धर्मपंथाच्या पलीकडं असलेल्या या मनुष्यजीवनाच्या पूर्णत्वाचं आणि त्याला मदत करणाऱ्या या गुरुतत्त्वाचं, त्याच्या कार्याचं स्वरूप थोडक्यात वर्णन करणारी ही गुरुतत्त्वतरंगिणी ! स्वतःचं सार्थक करू इच्छिणाऱ्या जीवनसाधकांच्या, गुरुपदाच्या सेवेत कृतज्ञतेनं अर्पण !

- सुहास पेठे

अध्याय : पहिला

जागतरंग

बरीचशी माणसं ही सामान्य जीवन जगतात. त्यात त्यांना दोष देण्यासारखं काही नाही. सावध होऊन, आपल्या क्षमतांची ओळख पटून अधिक उच्चतर जीवन आपण जगू शकतो, याची कल्पना त्यांना नसते, त्यामुळं असं घडतं. आजच्या आपल्या दैनंदिन आयुष्याचं स्वरूप समजून घेण्याचं काम या पहिल्या अध्यायात सुरुवातीला केलं आहे. त्यात असंही दिसून येईल की, सगळीच माणसं नुसतं जेवणं, झोपणं-उठणं, पोटासाठी श्रम करणं - अशा स्वरूपाचं सामान्य जीवन जगतात, असं नाही. तर काही माणसं त्यापलीकडं जाऊन थोडं मनोरंजन, थोडं सामाजिक कार्य, थोडा दानधर्म - अशाही गोष्टी ही माणसं करताना दिसतात. हे जीवन थोडं अधिक वरचं वाटलं, प्रगत वाटलं, तरी जे

मनुष्य म्हणून जगता येणं माणसाला शक्य आहे, जी झेप घेता येणं शक्य आहे, तिची जर माणसाला कल्पना आली तर या आयुष्याच्या मर्यादित आणि त्या अर्थानं तशा सामान्य पातळीची कल्पना त्याला येऊ शकेल.

थोडं उदात्त कार्य, दान, सेवा, देवधर्म, मठमहंती - या साऱ्या गोष्टी पूर्ण स्वार्थी पशुजीवनापेक्षा नक्की वरच्या पातळीवरच्या असल्या, तरी त्यांना मर्यादा असते. मनुष्य जर त्याच्या खऱ्या क्षमतांच्या बाबतीत जागा झाला, त्यानं त्या वापरून बघितल्या, तरच त्याला या मर्यादांची कल्पना येईल. ती येण्यासाठी अर्थातच त्याला यापेक्षा वरच्या आणि गरजेच्या जीवनाची कल्पना देणं, जाग देणं हे गुरुपदाचं जे प्राथमिक आणि प्रधान कार्य - त्याचं विवरण या जागतरंगामध्ये सोप्या शब्दांमध्ये केलेलं आहे.

आत्ताच्या जीवनाची निकृष्टता, फोलपणा, मर्यादा आणि उच्चतर जीवनाची कल्पना याबाबतीत तो सावध झाला, तर ' भ्रमाचे हे जिणे सारे, जागतो तोचि जाणतो ' असं इथं का म्हटलं आहे, हे स्पष्ट होईल !

।। श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

अध्याय : पहिला

जागतरंग

उद्धारास मनुष्याच्या, गुरुतत्त्वास ठेविले ।
तरंगिणीत ते जाणू, करू कर्तव्य आपुले ।।१।।

सामान्य जगणे आज, उठणे, श्रमणे तसे ।
जेवणे, झोपुनी जाणे, एवढे उरले असे ।।२।।

कोठे रंजन थोडेसे, थोडे कार्य उदात्तसे ।
परी ते जपुनी स्वार्थ, लोभतृष्णा मनी वसे ।।३।।

ज्ञान वा वित्त वा अन्न, कोणी दान करीतसे ।
हौस, हव्यास नावाचा, प्रसिद्धी त्यातही दिसे ।।४।।

सेवा, शास्त्रे, कला तैसे, सारे पैशास जोडले ।
शिक्षणे, मंदिरे, देव, त्यात व्यापार चालले ।।५।।

स्वशब्दाचे नसे मूल्य, मूल्यांचे मूल्य ना उरे ।
सत्ता, पैसा तसा स्वार्थ, साधता सर्वही फिरे ।।६।।

त्रिकाळ रोज कोणीही, करिती मार्गदर्शन ।
त्यास ना लागते ज्ञान, वा प्रयोगमय जीवन ।।७।।

प्रश्न ना सुटले ज्यांचे, स्वत:च्या जीवनातले ।
जाती ते सोडविण्या प्रश्न, लोकांच्या जीवनातले ।।८।।

अंतर्यामी सुसंवाद, असता जगि येतसे ।
येईल का समूहात, जे त्याच्या घटकीं नसे ।।९।।

निष्प्रेम जो घरामध्ये, व्यवसायात वा असे ।
स्वसुखी दक्ष राहून, अंती दु:खी सदा असे ।।१०।।

पळणे, विसरण्या दु:ख, रंजने, व्यसने तशी ।
नैराश्ये-मृत्यु-परपीडा, मानवी हीनता अशी ।।११।।

जो तो वापरतो दुसऱ्या, वाढे वापर-संस्कृती ।
पक्ष वा मठ वा देश, वापरास नसे मिती ।।१२।।

देहसौख्य तसे स्वार्थ, हेच आधार जाहले ।
त्याने अशांतता, भीती, यांनी जगतास व्यापिले ।।१३।।

सावधान जरी कोणी, होई या क्षुद्र जीवनी ।
निकृष्टता कळे त्यास, फोलता जाणवे मनी ।।१४।।

तेच ते जगणे सारे, दंभ-खोटे निरंतर ।
भेटतो कोणिही कोठे, जो तो स्वार्थास तत्पर ।।१५।।

जे जे दिसे, घडे ते ते, खरे मानी जसे तसे ।
समजे पूर्ण स्वत:ला तो, कृती तैशा करीतसे ।।१६।।

सद्‌गुरू ओळखी ना तो, इतरां तुच्छ मानितो ।
भ्रमाचे हे जिणे सारे, जागतो तोचि जाणतो ।।१७।।

खरेखोटे कळे जेव्हा, पूर्णापूर्ण कळे तसे ।
त्याला सद्‌गुरुचे कार्य, कळणे सुरु होतसे ।।१८।।

होतसे जीवनारंभ, माणसाचा खरा तिथे ।
नि:स्वार्थ-प्रेम-सत्याचा, शोध होतो सुरू जिथे ।।१९।।

कोठे ते शिकणे सारे, त्याचे उत्तर 'सद्‌गुरू' ।
ती असो व्यक्ति वा ग्रंथ, वा ते स्फुरण अंतरी ।।२०।।

जागणे हाचि आरंभ, गुरुमार्गावरी ठरे ।
गुरुकृपे घडो सर्वां, हेचि दीना मनी उरे ।।२१।।

जागतरंग नाम पहिला अध्याय समाप्त ।

श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।

अध्याय : दुसरा
पूर्णताशोधतरंग

साध्या व्यवहारात मनुष्य गुंतलेला असताना त्याला एखादी महत्त्वाची वस्तू कळली आणि तिची आपल्याला असलेली गरज लक्षात आली की, तो त्या वस्तूच्या शोधाला लागतो. त्यासाठी माहिती विचारतो, मदत घेतो, कष्ट करतो, ती वस्तू मिळवून त्यापासून मिळणारं सुखही मिळवतो. हे आपल्या नेहमीच्या आयुष्यात जसं घडतं, तसं जो या मूळ मनुष्यजीवनाविषयी जागा झाला तर,कुठल्याही, कसल्याही मार्गांनी, कुणीही ते पुरं करायचं ठरवलं, तरी ते पुरं होत नाही आणि अर्थातच अपूर्णतेत असमाधान असल्यामुळं मनुष्य- गरीब-श्रीमंत, देशी-विदेशी, ज्ञानी-अज्ञानी - कसाही असला तरी अखेर तो असमाधानी राहतो किंवा समाधानाच्या भ्रमात तरी जगतो, हे त्याच्या लक्षात येतं.

तेव्हा त्याला मनुष्यजन्माला येऊन जाग आली की, आपल्या आयुष्याला

खरी गरज जर कशाची असेल, तर ती पूर्णता या वस्तूची आहे, हे त्याच्या लक्षात येतं. गुरुकृपेनं जाग आल्यावर जर काही घडत असेल, तर ते हेच की, आजच्या जीवनाची अपूर्णता आणि त्यातच होणारा शेवट याविषयी मनुष्य सावध होतो आणि पूर्णतेच्या शोधाला लागतो.

मनुष्य पूर्णतेचे शोध करीत नाही, असं नाही. पण एकतर त्याच्या या प्रयत्नांचं स्वरूप ज्या ज्या कमतरता त्याला प्रपंचात दिसतात, त्या त्या वस्तू आणून, विद्या-पैसा-सत्ता इत्यादी गोष्टी मिळवून ही पूर्णता आणण्याचा त्याचा प्रयत्न आयुष्यभर सुरू असतो. तो यशस्वी झाला तरी खऱ्या अर्थानं पूर्णता येत नाही, हे त्याला स्वतःच्या आणि इतरांच्या समोर दिसत असलेल्या आयुष्यांवरून लक्षात येऊ शकतं. दुसरं म्हणजे जी खरी पूर्णता आहे, ती आणण्यात त्याच्याकडे ज्या अडचणीच्या गोष्टी आहेत, उदाहरणार्थ मीपणा, लघुत्व, वेगळेपण टिकवण्याची आवड इ. - त्यांची जाणीव त्याला या शोधामध्ये होते. मग खऱ्या पूर्णत्वाचा शोध सुरू होतो, त्यासाठी मदत करणाऱ्या गुरूंकडून 'मार्गही मिळतो त्यास, बोधही त्यास होतसे ! '

।। श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

अध्याय : दुसरा

पूर्णताशोधतरंग

श्रीमंत जगतामध्ये, असो कोणी गरीबही ।
निरोगीरोगि वा दुर्बळ, सत्तावान, सशक्तही ।।१।।

नसो वा असु दे काही, केवढेही कुणाकडे ।
त्यांच्यापाशी असे नक्की, एक जे त्यांस आवडे ।।२।।

‘मीपणा’ एक सर्वांत, आहे भरून राहिला ।
नकळो वा कळो कोणा, जीव प्रत्येक ग्रासला ।।३।।

निर्धनास जसा आहे, तसा धनिकासही असे ।
असो विद्या, नसो विद्या, मीपणा ठेविला असे ।।४।।

रूपाने श्रेष्ठ कित्येक, कुरूप जगि जाहले ।
दोघेही जपती ‘मी’स, कुणी ना ‘मी’स सोडले ।।५।।

मीपणा वा अहंभाव, प्रिय जीवांस वाटतो ।
पूर्णत्वाला परी जाण्या, तोच जीवांस अडवितो ।।६।।

रूपे घेउन तो नाना, व्यवहारात आढळे ।
निर्मितो दु:ख अपुल्यात, तरि थोडाहि ना ढळे ।।७।।

करी माझेतुझे नित्य, त्यांत मी श्रेष्ठ वेगळा ।
होवो अपयशी, दु:खी, तरी आदर्श मी भला ।।८।।

असो क्षेत्र कुटुंबाचे, धंदा वा नोकरी असो ।
क्षेत्र अध्यात्म वा शास्त्र, कला, काव्य कसे असो ।।९।।

वेगळेपण जपण्याची, इच्छा जीवात निर्मितो ।
सर्वत्र स्वतंत्र अस्तित्व, ठेवण्या भाग पाडितो ।।१०।।

प्रत्येक माणसाइतुके, किंवा श्रेष्ठ, गुणी, यशी ।
तसे अपयशी असती, दुःखे मोठी जगी जशी ।।११।।

त्यांतला एक मी आहे, हे सत्य असते खरे ।
परी मानी पहा जो तो, माझे दुसऱ्यापरी नसे ।।१२।।

वास्तवात अपूर्णाचे, नसे का तेच लक्षण ।
शक्तीबुद्धी असो काही, राहणे हेचि जाणुन ।।१३।।

जाणणे, शोधणे पूर्ण, जगामध्ये कुठे असे ।
त्यासाठी नम्रता उत्तर, व्हावे शरण हे असे ।।१४।।

सर्वदा शिकण्याजोगे, इतरांत जगी वसे ।
गुरुतत्त्वाचे कुणालाही, तेथ दर्शन होतसे ।।१५।।

दुबळे बाळ कसे असते, ठेविले दुपट्यावरी ।
शरण ते जात आईस, गरजा ती पुऱ्या करी ।।१६।।

माणूस दुबळा असतो, गरजा बदलती जरी ।
अपूर्णता जगामध्ये, जोवरी साथ त्या करी ।।१७।।

स्वावलंबी जरी होतो, वाढे वय जसे तसा ।
परंतु ना कधी पूर्ण, अपुरा तो असे तसा ।।१८।।

एक विद्या जमे त्यास, जाणी कित्येक ना कधी ।
नसे सत्ता, कधी पैसा, प्रकृती, माणसे कधी ।।१९।।

रेषा नेल्या किती दूर, मूळ कोन तसा असे ।
व्यापिले वाटते विश्व, राहती अंश ते तसे ।।२०।।

जाणणे हे अपूर्णत्व, मानवी जीवनातले ।
ओळखी जो लघुत्वास, त्याचे कल्याण जाहले ।।२१।।

लघुत्व जाणण्यामधुनी, सध्याच्या क्षुद्र जीवनी ।
पूर्णाची लागते ओढ, देई का ते कुणा कुणी ।।२२।।

भगवंत असे सदा पूर्ण, दाखवी सद्‌गुरू भला ।
गुरुतत्त्व पहा सिद्ध, दाविण्या मार्ग तेथला ।।२३।।

असंख्यात गुरू असती, विद्या जे देत मानवा ।
ज्ञान, पैसा तसे स्थैर्य, मिळते त्यांतून या जिवां ।।२४।।

अपूर्ण परी तसे दाते, देती ते पूर्ण ना असे ।
त्यातून साधते तेही, अपूर्ण राहते तसे ।।२५।।

अपूर्णता जिथे आहे, तिथे शांती कधी नसे ।
समाधान तिथे नसते, मात्र पूर्णात ते वसे ।।२६।।

पिता, माता तसे ज्येष्ठ, विद्यागुरु असंख्यही ।
गुरुतत्त्व असे थोडे, त्यांच्या रूपात व्यक्तही ।।२७।।

शोधणे गुरुतत्त्वास, पूर्ण कोठे कसे असे ।
तसे शांतिसमाधान, का मनी अपुल्या नसे ।।२८।।

शोधण्या जात कोणी जो, त्याला मदत होतसे ।
मार्गही मिळतो त्यास, बोधही त्यास होतसे ।।२९।।

पूर्णताशोध नावाचा, द्वितीयाध्याय संपला ।
जागला दीन जो प्रथमी, आता शोधास लागला ।।३०।।

पूर्णताशोधतरंग नाम दुसरा अध्याय समाप्त ।

श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।

अध्याय : तिसरा

सद्‌गुरुकार्यतरंग

पूर्णत्वाच्या शोधाला लागलेल्या माणसाच्या लक्षात मग अनेक गोष्टी येऊ लागतात. तो जागा झाल्यामुळं त्याला त्याच्या सध्याच्या जीवनाची निकृष्टता कळतेच पण त्याच्याच बरोबर त्याच्याजवळ पूर्णत्व गाठण्यासाठी किंवा खरंतर तो स्वतः पूर्ण आहे हे जाणून जगण्यासाठी दिलेल्या दिव्य शक्तींची त्याला ओळख होते. तसं पाहिलं तर, परमेश्वरानं सृष्टीमध्ये अगदी झाडपेड, फूलपान, अशा साऱ्या वस्तुजाताला वेगळावेगळा आकार दिला आहे. तसाच तो माणसालाही दिला आहे. पण हे सारं वेगळेपण दृश्यातलं आहे. बाह्य जगतातलं आहे. ही गोष्ट जर त्यानं जागं होऊन तटस्थपणे विचार केला आणि कृपा झाली तरच त्याच्या लक्षात येऊ शकेल.

वेगळेपणा हा दृश्यामधला ईशशक्तीचा मनोरम आविष्कार असला

तरी एकतर तो त्या शक्तीच्या निर्मितीतल्या विविधतेच्या-सौंदर्याच्या शक्तीचा आविष्कार आहे, एवढंच. मनुष्य ज्या अर्थानं या साऱ्याचं नकळत अनुकरण करून अंतर्यामीसुद्धा स्वतःला वेगळं समजतो, अर्थातच श्रेष्ठ समजतो आणि ते वेगळेपण जपायचा प्रयत्न करतो, तेच त्याच्या पूर्णतेच्या आड येतं. कारण परमेश्वरानं व्यक्त केलेलं वेगळेपण हे फक्त व्यक्तापुरतं, दृश्यापुरतं आहे. अंतर्यामी सर्व माणसांच्या ठिकाणी अत्यंत एकरूप असलेलं आणि पूर्णत्वानं वास करणारं, सर्वांशी तितकंच साररूप्या पातळीवर जोडलेलं चैतन्य विद्यमान आहे. इतकंच काय, हे चैतन्य आणि त्याचं ऐक्य एकदा लक्षात आलं की, त्या क्षणी त्याला पूर्णत्वाचा अनुभव येऊ शकतो आणि हे साधनेनं टिकवता येऊ शकलं, तर हेच चैतन्य सर्व माणसांतच नव्हे तर पशुपक्षी, झाडपेड, दगडमाती - अशा निसर्गाच्या साऱ्या आविष्कारातही विद्यमान आहे आणि त्या अर्थानं हे सर्व जोडलेलं आणि पूर्ण आहे. या अद्वैतात त्याला आनंदाचा जो साक्षात्कार होतो, तो सर्वांना होवो आणि त्याला मदत करणारी गुरुपदव्यवस्था सर्वांना लाभो, हे या अध्यायातलं संक्षिप्त पसायदान आहे !

।। श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

अध्याय : तिसरा

सद्‌गुरुकार्यतरंग

जागतो जाणतो जीवन, तशी त्याची अपूर्णता ।
जाणो, जगो अभिप्राय, तरंगी तत्त्व शोधता ।।१।।

अपूर्ण मानवी जीवन, कर्ता कर्म अपूर्णसे ।
त्याला लाभे कसे पूर्ण, तो कैसा पूर्ण होतसे ।।२।।

चालतो जगतामध्ये, मेळ अदृश्यदृश्य हा ।
अव्यक्त होतसे व्यक्त, आकारा येउनी पहा ।।३।।

झाडेपेडे, घरे, वस्तू, कित्येक जगतात या ।
माणूस हाहि आकार, दिव्य शक्ती दिल्या जया ।।४।।

परी ना ओळखी, जाणे, काय झेप तयाकडे ।
अदृश्य गाठणे शक्य, क्षुद्र दृश्य तयापुढे ।।५।।

आगळा अंतरी होय, जाणीना सहसा तसे ।
पूर्णास जाणणे शक्य, होणे पूर्ण तया असे ।।६।।

दृश्यास मानुनी सत्य, जो तो आयुष्य चालवी ।
परी मोडे घडे ते ते, जे जे आकार व्यक्तवी ।।७।।

जसा माणूस हा दृश्य, आकारे वेगळा असे ।
वेगळेपण त्या वाटे, जपावे ते स्वतंत्रसे ।।८।।

बोलता, चालता, जगता, वेगळा मी असेन ना ।
मते, कार्ये, घरे, वस्तू, माझ्या असतील भिन्न ना ।।९।।

चिंतेने या सदा ग्रासे, कृती तैशा करीतसे ।
यातील भ्रम जाणीना, वृद्धत्वा जरि येतसे ।।१०।।

आकारे वेगळा होतो, प्रारब्धे जरि मानव ।
अंतरी तो असे एक, जोडली सर्व जाणिव ।।११।।

दृश्यातही दिसे भिन्न, जरी प्रत्येक आकृती ।
त्यांतही साम्यता मोठी, देते सर्वांस प्रकृती ।।१२।।

मानवे निर्मिले सारे, भाषासंस्कार भेद हे ।
त्याने तो वेगळा भासे, भेद ना मूळ येथ हे ।।१३।।

वेगळेपण सौख्याचे, वाटे सर्वांस ते जरी ।
व्यवहारार्थ ते लागे, तेवढे कार्य ते करी ।।१४।।

बसणे जपत ते पुढती, सुखाचा भ्रम तो असे ।
म्हणुनी देतसे दु:खा, जो जो जपत त्या असे ।।१५।।

साधर्म्य अंतरी असते, एक निर्जीव जीवही ।
शोधता ते कळे सर्वां, अनुभवा येत प्रत्यही ।।१६।।

बोधण्या ते मना सारे, शोधण्या बळ लागते ।
सद्‌गुरू आगळी शक्ती, मुक्तिमार्गास दाविते ।।१७।।

वेगळेपण बंधाचे, एकत्वी मुक्ति होतसे ।
प्रामाणिक असे त्याला, विचारे बोध होतसे ।।१८।।

परी अनुभवा येण्या, तैसे सारे स्थिरावण्या ।
लागती सद्‌गुरू तेथे, ऐसे अद्वैत जाणण्या ।।१९।।

जमते कार्य कुठलेही, स्वप्रयत्ने कुणासही ।
परंतु पाहणे दुष्कर, अहंकारास प्रत्यही ।।२०।।

अणुरेणूहुनी सूक्ष्म, मीपणा हा किती असे ।
सद्‌गुरू लागती त्यास, जाणण्या, जाळण्या तसे ।।२१।।

उद्धारास व्यवस्था ही, भगवंताची कृपा असे ।
गुरुतत्त्व निराकार, सद्‌गुरू प्रतिनिधी असे ।।२२।।

हाती सद्‌गुरुनी धरिता, आत्मदर्शन होतसे ।
वेगळेपण, द्वैताचा, भ्रम हा नष्ट होतसे ।।२३।।

प्रयत्ना साह्य ते होती, दक्ष सांभाळ करावया ।
प्रतिक्षणी सावधान, राखून करिती दया ।।२४।।

द्वैत बंधन जाताच, सर्व पूर्ण जगी दिसे ।
अपूर्ण जग ते आता, अवघे पूर्ण होतसे ।।२५।।

प्रेमाने जोडिले जाते, चैतन्ये सांधले असे ।
जातसे क्षुद्रता सारी, आनंद भरुनी वसे ।।२६।।

व्यक्तापुढील अव्यक्त, अद्वैत भगवंत तो ।
अनुभवा आणुनी सद्‌गुरु, मुक्तिचे कार्य साधितो ।।२७।।

विदेही, प्रेमि, नि:स्वार्थी, निरपेक्ष तसा असे ।
जीव-उद्धार हा ध्यास, भूतली ईश जो वसे ।।२८।।

गुरुतत्त्वव्यवस्था ही, सर्वांना लाभली असे ।
गाठोत सर्व पूर्णत्व, शोधुनी सद्‌गुरू तसे ।।२९।।

सर्वांना सद्‌गुरु लाभोत, तशी जीवांस मुक्तता ।
स्वानन्दे सर्व नांदोत, तीच दीनास धन्यता ।।३०।।

सद्‌गुरुकार्यतरंग नाम तिसरा अध्याय समाप्त ।

श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।
ॐ तत् सत् ।।

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम
२१. चिंतनक्षण (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना
३०. अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १

३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा	३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ	३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश	४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१.समओवी पारायणप्रत	४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)

५५. शिदोरी	५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २	५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २	६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी	६२. श्रद्धेची पहाट

६३. उपासनामाला

६४. पावनपथ

६५. अनुभवपुष्पे - भाग १

६६. कृतज्ञतामार्ग

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

६९. संतबोध : भाग ४

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार

७१. उत्तरायण -भाग ३

७२. अनुभवपुष्पे - भाग २

७३. श्रद्धा

७४. अनुभवपुष्पे - भाग ३

७५. अर्घ्य

७६. जीवनचिंतन

७७. स्वास्थ्यसंवाद

७८. वचनांजली भाग १

७९. अक्षरायण

८०. वचनांजली भाग २

८१. भावगीता

***

गुरुतत्त्वतरंगिणी

मानवी उद्धाराची ईश्वरी व्यवस्था म्हणजे सर्वत्र भरून राहिलेले गुरुतत्त्व होय. शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना ते कुठल्याही रूपाने, कधीही मदत करायला व त्यांची प्रगती घडवून त्यांना मुक्त करायला तत्पर व उत्सुक असते. मनुष्यदेहधारी सद्गुरू हे त्या तत्त्वाचे आदरणीय प्रतिनिधी होत. येथे तीन अध्यायांत या गुरुतत्त्वाच्या कार्याचे संक्षेपाने सुबोध श्लोकबद्ध विवरण आले आहे. साधकांसह सर्वच जिज्ञासूंना चिंतनाला ते उपयुक्त ठरेल.

संतछाया, सातारा